Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 06 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राज्यसभेत उत्तर देणार आहेत. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी समाजमाध्यमावरील संदेशात ही माहिती दिली. लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव दोन दिवसांपूर्वीच स्वीकृत करण्यात आला आहे.

****

विकसीत भारत २०४७ यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पथदर्शी कार्यक्रमास सुसंगत विकास आराखडा तयार करणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही.आर. सुब्रह्मण्यम यांनी काल मुख्यमंत्री फडणवीस यांची मुंबईत सदिच्छा भेट घेतली. या भेटीवेळी सुब्रह्मण्यम यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निती आयोगाच्या संकल्पना आणि राज्याने कोणत्या क्षेत्रात काम करण्याची अपेक्षा आहे, याविषयी माहिती दिली.

****

कोकण विभागातील म्हाडाच्या सदनिका आणि भूखंड विक्रीची संगणकीय सोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल ठाणे इथं काढण्यात आली. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात लाभार्थ्यांना घरांचं वाटप करण्यात आलं.

****

राज्यातील १६ कृषी उत्पन्न बाजार समित्या ई-नामशी जोडून आधुनिक तंत्रज्ञानानं त्या अद्ययावत ठेवल्या जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी काल पुण्यात सांगितलं. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या संचालक मंडळाची बैठक रावल यांच्या अध्यक्षतेखाली झाली,त्यावेळी ते बोलत होते. कृषी पणन मंडळात प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करावी, याकरता

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासोबतच तज्ज्ञ सल्लागाराची मदत घ्यावी, अशा सूचनाही रावल यांनी यावेळी दिल्या.

****

शाळांमध्ये आरटीई अंतर्गत होणारी प्रवेश प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाईन पारदर्शक प्रक्रिया असून यात कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय लॉटरी पद्धतीनं लाभार्थ्यांची निवड होते आणि पात्र तसंच प्रतिक्षाधीन बालकांची यादी शाळानिहाय घोषित केली जाते. पालकांना बालकांच्या आरटीई प्रवेशासाठी काही प्रलोभनं दिली जात असतील, तर त्या प्रलोभनांना बळी न पडता त्याबाबतची माहिती जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांना द्यावी. कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई होईल, असं प्राथमिक शिक्षण संचालनालयानं कळवलं आहे.

****

गडचिरोली जिल्हा मलेरियामुक्त करण्यासाठी डॉक्टर अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील कृती दलानं सादर केलेल्या आराखड्याची येत्या एक एप्रिलपासून अंमलबजावणी केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. यासाठी आदिवासी विभागामार्फत २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्याची माहिती त्यांनी दिली.

****

राज्यात स्वतंत्र कला विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात शासन स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीची उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात बैठक झाली. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ हटाव कृती समितीने शासनाला सादर केलेल्या निवेदनातील तक्रारींच्या अनुषंगाने गठीत समितीने सखोल अभ्यास करून तातडीने सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा, अशा सूचना पाटील यांनी यावेळी दिल्या. राज्यातील कला महाविद्यालयांना अनुदान देण्यासंदर्भात वर्गवारी करून सविस्तर प्रस्ताव तयार करावा, प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाकडे सादर करून यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असं पाटील यांनी सांगितलं.

****

प्रयागराज इथं आज महाकुंभात आदिवासी सांस्कृतिक समागम-२०२५ आयोजित करण्यात आला आहे. देशभरातील १५ हजारांहून अधिक आदिवासी यामध्ये सहभागी होतील. सहा दिवसांच्या या महोत्सवात, सर्व सहभागी आदिवासी संस्कृती आणि परंपरा जपण्याची प्रतिज्ञा घेणार आहेत. बिरसा मुंडा यांच्या १५० व्या

जयंतीनिमित्त २०२५ हे वर्ष आदिवासी अभिमानाचे वर्ष म्हणून घोषित करण्यात आलं आहे. दरम्यान आज सकाळी आठ वाजेपर्यंत जवळपास ३७ हजार ८० लाख भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केल्याची माहिती महाकुंभ मेळा प्रशासनानं दिली आहे.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ८२ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३५ रौप्य आणि ३१ कास्यपदकांचा समावेश आहे. सर्वाधिक सुवर्ण पदक जिंकून कर्नाटक पहिल्या, सेना दल दुसऱ्या, मध्य प्रदेश तिसऱ्या आणि महाराष्ट्र चौथ्या स्थानावर आहे.

****

भारत आणि इंग्लंड दरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांच्या क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज नागपूर इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. भारतीय पुरुष संघानं ऑगस्टमध्ये श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय मालिका २-० अशी गमावली होती. त्यानंतर प्रथमच भारतीय संघ एकदिवसीय मालिकेसाठी मैदानात उतरत आहे. या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी कटकमध्ये तर शेवटचा सामना १२ फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये होणार आहे.

****

मुंबई ओपन टेनिस स्पर्धेच्या महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत आज भारताची प्रार्थना ठोंबरे आणि नेदरलँडसची एरियन हार्टोनो जोडीचा सामना नाओ हिबिनो आणि ओक्साना कलाश्निकोवा जोडीविरुद्ध आहे. महिला एकेरीच्या १६ व्या फेरीत आज अंकिता राणा, श्रीवल्ली रश्मिका, माया राजेश्वरन या भारतीय खेळाडूंचे सामने होणार आहेत.

****